**MHKO110003902012**

<u>नियमित दिवाणी दावा क्र. १५६ / २०१२</u>
(CNR No.**MHKO110003902012**)

## <u>निशाणी क्र. ७० खाली आदेश</u>

०१. प्रस्तुत अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०१ नियम १० व आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीकरीता व दाव्यात पक्षकार यांना सामील करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. वादींचे अर्जातील कथन की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांच्या विरुद्ध कराराची पुर्तता करून खरेदीपत्र वादींना करून देण्यासाठी व दरम्यानच्या उत्पन्न मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादींनी दिनांक ०८/११/२०१७ रोजीच्या खरेदी दस्त क्र. ५७१५/२०१७ अन्वये श्री. श्रीपती बळीराम पोवार यांना दावा मिळकत खरेदी दिली असल्याचे वादींना समजून आले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा गुणदोषांवर निर्गत करण्यासाठी त्यांना श्रीपती बळीराम पोवार यांना प्रतिवादी क्र.४ म्हणून सामील करून दाव्यात पुढील प्रमाणे दुरुस्ती करण्याची आहे.

अ. दावा अर्ज कलम ९-अ मध्ये ते खालील प्रमाणे दुरुस्ती सुचवत आहेत.

> ९-अ. प्रस्तुत दावा प्रलंबित असताना यातील प्रतिवादींनी आणि श्री. श्रीपती बळवंत पोवार रा. संभापूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांनी एकमेकांशी संगनमत करून दाव्यासंबंधी वस्तुस्थिती लपवून कोणतीही चौकशी न करता वादींचे दावा मिळकतीमधील कायदेशरी हक्क डावललेच्या व नुकसान करण्याच्या व फसवणूक करण्याच्या गैर हेतूने खरेदी दस्त क्र.५७१५/२०१७ दिनांक ०८/११/२०१७ चे खरेदीपत्राने दावा मिळकत श्री. श्रीपती बळीराम पोवार, रा. संभापूर, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांना खरेदी दिलेले आहे. प्रतिवादींचे सदरील कृत्य पूर्णपणे बेकायदेशीर असून दावा मिळकतीचे खरेदीपत्र करून घेणेच्या वादीच्या कायदेशीर हक्क अधिकारास बाधा निर्माण करणारी आहे.

ब. तसेच दावा कलम ११ मध्ये ते खालील दुरुस्ती सुचवत आहेत.

रक्कम रू.१०००/- असे नमुद करून त्यापुढे दावेचे कामी दावा प्रलंबित असताना केलेले दिनांक ०८/११/२०१७ रोजीचे खरेदीपत्र मुतः बेकायदेशीर व वादी वर बंधनकारक नाहीत असे हक्कज्ञापन मिळण्याच्या दादी बाबत कोर्ट फी ॲक्टचे कलम ६(४)(जे) प्रमाणे आकारणी सदरी दाखल असे नमुद करून रक्कम रू.२,७५,३००/- ऐवजी २,७६,३००/- असे नमुद करणेचे आहे.

क. दाव्याच्या शिर्षकामध्ये ते खालील दुरुस्ती सुचवत आहेत.

रक्कम रू.२,७५,३००/- ऐवजी २,७६,३००/- अशी दुरूस्ती करण्याची आहे.

ड. दाव्याच्या विनंती कलमामध्ये ते खालील दुरूस्ती सुचवत आहेत.

ड-ड-ड - प्रतिवादींनी प्रस्तुता दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीचे दस्त क्र. ५७१५/२०१७ दिनांक ०८/११/२०१७ रोजीचे करून दिलेले खरेदीपत्र मुलतः बेकायदेशीर व बवादीचे हक्क अधिकारावर बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन होवून मिळावे तसा ठराव व हुकूमनामा व्हावा.

०३. वादींचे पुढील कथन की, सदर दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. परंतु याउलट वादींचे अपरिमित व कायमस्वरूपी नुकसान होणार आहे. वादींनी मागितलेली दुरुस्ती दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घटनांमुळे होत आहे. त्यामुळे, सदरची दुरुस्ती मंजूर होणे अत्यंत निकडीचे आहे. सबब वादींनी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

०४. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे निशाणी क्र.७१ वर सादर करून सदरचा अर्ज हा खोटा व चुकीचा असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार, दावा मिळकत सन २०१७ मध्ये विक्री केल्याची माहिती वादी यांना होती. मात्र त्यावेळी वादी यांनी त्याबाबत कोणतीही हरकत घेतली नव्हती. तसेच, श्री. श्रीपती बळीराम पोवार यांना

दाव्यात सामील करून वादी हे दाव्याचे मूळ स्वरूप बदलू पाहात आहेत. त्यामुळे या सर्व कारणास्तव प्रतिवादी यांनी वादीचा सदरचा अर्ज हा खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. प्रस्तुतचा अर्ज व त्यावर प्रतिवादींनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

०६. वादींच्या अर्जातील कथने, प्रतिवादीने दाखल केलेले म्हणणे व अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचा विचार करता माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत. सदर मुद्दे त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| ***अ.क्र.*** | ***मुद्दे*** | ***निष्कर्ष*** |
|---|---|---|
| १. | सुचवलेली दावा दुरुस्ती पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक आहे काय ? | ***होकारार्थी*** |
| २. | सुचविण्यात आलेले पक्षकार हे दाव्यातील वाद प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक पक्षकार आहेत काय ? | ***होकारार्थी*** |
| ३. | काय आदेश ? | ***अर्ज मंजूर करण्यात येत आहे.*** |

## **कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता** -

०७. मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदर मुद्दे चर्चेकरिता एकत्रित विचारात घेण्यात येत आहेत.

०८. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादींनी कराराची पुर्तता करून खरेदीपत्र करून मिळण्यासाठी व दरम्यानचे उत्पन्न मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादींच्या कथनानुसार, प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादींनी दिनांक ०८/११/२०१७ रोजीच्या खरेदी दस्त क्र. ५७१५/२०१७ अन्वये श्री.

श्रीपती बळीराम पोवार यांना दावा मिळकत खरेदी दिली असून त्यांना दाव्यात आवश्यक पक्षकार यांना सामिल करून त्याअनुशंगाने दाव्यात दुरूस्ती करण्याची आहे. याउलट, प्रतिवादी यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये दावा मिळकत विक्री केली असल्याची बाब नाकारलेली नाही.

०९. प्रस्तुत प्रकरणामध्ये वाद मुद्दे निश्चित करण्यात आले असून वादी तर्फे साक्षीदार यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे. मात्र दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनांमुळे वादी यांनी सदरचा दावा दुरुस्त करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तसेच, प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकत ही तिऱ्हाईत इसमास विक्री केली आहे. त्यामुळे, दाव्यातील खराखुरा वाद गुणदोषांवर निर्गत करण्यासाठी, दावा मिळकतीशी संबंधीत संपूर्ण माहिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. तसेच, दावा मिळकतीशी संबंधीत सर्व पक्षकार हे दाव्यात सामील असणे आवश्यक आहे.

१०. अशा परिस्थितीमध्ये सदरचा अर्ज मंजूर करून वादींना त्यांच्या वादकथनांमध्ये सुधारणा करण्यास मंजुरी दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, कारण प्रतिवादीला वादीच्या वाद कथनांमध्ये झालेल्या सुधारणेनुसार जादा कैफियत व त्या अनुषंगाने त्यांचा जादा पुरावा देण्याची मुबलक संधी आहे. उलटपक्षी दाव्याचा गुणदोषावर अंतिम न्यायनिवाडा करणेकामी प्रस्तावित सुधारणा करून आवश्यक पक्षकार यांना दाव्यात सामिल करणेही क्रमप्राप्त आहे. वरील सर्व गोष्टींचा विचार करता, मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.३ चे निष्कर्षाकरिता खालील आदेश पारित करत आहे.

<u>आदेश</u>

१. वादींचा **निशाणी क्र.७०** वरील अर्ज, रक्कम रू. ३००/- इतक्या दंड रक्कमेवर मंजूर करण्यात येत आहे. सदरची दंडाची रक्कम वादींनी तालुका विधी सेवा, पेठवडगांव यांच्याकडे जमा करावी.

२. वादी यांनी अर्जात नमूद श्रीपती बळीराम पोवार यांना प्रतिवादी म्हणून दाव्यात सामील करावे.

३. वादींनी प्रस्तुत आदेशाचे तारखेपासुन १४ दिवसांच्या आत अर्जात नमूद केल्यानुसार दावा दुरुस्ती करून दाव्याची दावा दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

४. येणेप्रमाणे **निशाणी क्र.७०** वरील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

(**एल. एम. पठाण**)

दिनांक. २२/०२/२०२४. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पेठ वडगांव